जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये माहिती तंत्रज्ञान कार्यालय सहायकाची सेवा बाह्य यंत्रणेव्दारे (Outsourcing) घेणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय-आसक-२०१७/प्र.क्र.३८/आपले सरकार कक्ष

बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट,
मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
तारीख: १५ मार्च, २०१८

वाचा :-

१) **शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्रमांक-संग्राम-२०१५/प्र.क्र.९३/संग्राम कक्ष, दिनांक:- ११ ऑगस्ट, २०१६.**
२) **शासन निर्णय, सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग क्रमांक - मातंसं-१७१६/प्र.क्र.२८६/३९, दिनांक:- ९ ऑगस्ट,२०१६.**
३) **शासन निर्णय, सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग क्रमांक - मातंसं-१७१७/प्र.क्र.१११/३९, दिनांक:- २४ मार्च,२०१७.**
४) **व्यस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ यांचा दिनांक:- ११ डिसेंबर, २०१७ चा ई-मेल.**

प्रस्तावना :

संदर्भाधिन शासन निर्णय, दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ अन्वये राज्यभरातील ग्रामपंचायतीमध्ये आपले सरकार सेवा केंद्र सीएससी-एसपीव्ही मार्फत चालविण्यात येत आहे. ग्रामपंचायत स्तरावरील लेख्यांचे संगणकीकरण आपले सरकार सेवा केंद्रातील केंद्र चालकांमार्फत करण्यात येते. तथापि, या प्रकल्पामध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर संगणक ऑपरेटरची तथा संगणक सहायकांची तरतूद केलेली नाही, त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर संगणकीय कामे करण्यासाठी तांत्रिक मनुष्यबळाच्या सेवा बाह्य यंत्रणेव्दारे घेण्याच्या अनुषंगाने मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर लेख्यांची माहिती संगणकीकृत करुन केंद्र शासनाच्या PRIYASoft व इतर या आज्ञावलीत माहिती भरणे. तसेच, पंचायत राज मंत्रालय, केंद्र शासन व राज्य शासनाच्या इतर आज्ञावलींमध्ये माहिती भरणे इ. संगणकीय कामाच्या अनुषंगाने प्रत्येक जिल्हा परिषद

स्तरावर कमाल ५ आणि प्रत्येक पंचायत समिती करिता कमाल २ माहिती तंत्रज्ञान कार्यालय सहायक (IT Office Assistant) बाह्य यंत्रणेव्दारे (Outsourcing) घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

१. सदरहू माहिती तंत्रज्ञान कार्यालय सहायक (IT Office Assistant) यांच्या कामाचे स्वरूप (Job Chart) खालीलप्रमाणे राहील.

i. एन.आय.सी. च्या ई-पंचायत सॉफ्टवेअर प्रणालीमधील जिल्हा स्तर व तालुका स्तरावरील डेटा एंट्री करणे. (११ आज्ञावली त्यांच्याकडून:- १. नॅशनल पंचायत डिरेक्टरी / लोकल गव्हर्नमेंट डिरेक्टरी, २. नॅशनल पंचायत प्रोफाईलर / एरिया प्रोफाईलर, ३. प्लॅन प्लस, ४. प्रियासॉफ्ट, ५. ॲक्शन सॉफ्ट, ६. ॲसेट डिरेक्टरी, ७. सर्व्हिस प्लस, ८. ट्रेनिंग मॅनेजमेंट, ९. सोशल ऑडिट व मीटिंग मॅनेजमेंट, १०. नॅशनल पंचायत पोर्टल, ११. बेसिक GIS प्रणाली.)

ii. जिल्हा स्तरावर राबविण्यात येणाऱ्या प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टिममध्ये डेटा एंट्री करणे.

iii. जिल्हा परिषद स्तरावर आस्थापना विषयक बाबींसाठी तयार करण्यात येणाऱ्या केडर मॅनेजमेंट सिस्टिम मधील डेटा एंट्री करणे.

iv. शासनाला लागणाऱ्या वेगवेगळ्या डेटाबेससाठी MIS मध्ये डेटा एंट्री करणे.

v. शासनाचे विविध अहवालासांठी MIS तयार करण्यात येतात, त्याची डेटा एंट्री करणे.

vi. ऑनलाईन आपले सरकार तक्रारी, PG पोर्टल, सेवा हमी कायदा इत्यादी प्रणालींसाठी जिल्हा परिषद अधिकाऱ्यांना सहाय्य करणे.

vii. तद्नूषंगीक इतर माहिती तंत्रज्ञान विषयक कामे.

२. सदरहू माहिती तंत्रज्ञान कार्यालय सहायक (IT Office Assistant) माहिती व तंत्रज्ञान महामंडळ, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून संदर्भाधिन क्रमांक ३ वरील शासन निर्णयानुसार घेण्यात यावेत. सदर मनुष्यबळ उपलब्ध करुन देणेबाबत माहिती व तंत्रज्ञान महामंडळास स्वतंत्रपणे मागणीपत्र संबंधित जिल्हा परिषदेने नोंदवावे.

३. याकरिता होणारा खर्च त्या त्या जिल्हा परिषदेने त्यांच्या स्व-उत्पन्नातून भागवावा. सदर बाह्य यंत्रणेव्दारे (Outsourcing) भरण्यात येणाऱ्या उमेदवारांना शासन / जिल्हा परिषद सेवेत सामावून घेण्याचा कोणताही अधिकार राहणार नाही.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-४३४/आपुक, दिनांक:- १०/८/२०१७ नुसार व उच्चस्तरीय समितीच्या उप समितीने दिनांक:- ३०/१०/२०१७ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-७०/आपुक, दिनांक:- १६/०२/२०१८ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक **२०१८०३१५१५३१०८८२२०** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Narayan Bhaskar Ringane

Digitally signed by Narayan Bhaskar Ringane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d9af780863a29e5ba66bbc39e6f9c1e31d9d4bbd5f5159dee9c14cf33ac34321, cn=Narayan Bhaskar Ringane
Date: 2018.03.15 16:45:43 +05'30'

(ना.भा.रिंगणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. सर्व मा. विधान मंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
४. मा. प्रधान सचिव, विधान मंडळ सचिवालय
५. शासनाचे मुख्य सचिव
६. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सर्व प्रशासकीय विभाग)
७. सर्व विभागीय आयुक्त,

८. सर्व सह सचिव/उप सचिव (ग्राम विकास)
९. सर्व जिल्हाधिकारी
१०. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव
११. मा. राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव
१२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ, मंत्रालय,मुंबई-३२
१४. सर्व जिल्हा परिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
१५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१६. सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पंचायत/सा.प्र.वि.)
१७. सर्व पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी
१८. वित्त विभाग (व्यय-१५/आपुक),मंत्रालय,मुंबई-३२
१९. महालेखापाल-१/२(लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र मुंबई/नागपूर
२०. महालेखापाल-१/२(लेखा परिक्षा) महाराष्ट्र मुंबई/नागपूर
२१. महालेखापाल (वाणिज्यिक लेखा) महाराष्ट्र, मुंबई
२२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२३. CSC-SPV e-Governance india LTD, इलेक्ट्रीक निकेतन, तिसरा मजला, DeITY,६ सीजीओ कॉम्प्लेक्स, लोधी रोड, नवी दिल्ली-११०००३
२४. स्वीय सहाय्यक, प्रधान सचिव (मा. व तं.)मा. प्रधान सचिव(मा.व तं.) यांचे अवलोकनार्थ
२५. स्वीय सहायक सचिव (ग्रा.वि.)मा. सचिव (ग्रामविकास) यांचे अवलोकनार्थ
२६. निवडनस्ती, आपले सरकार कक्ष, ग्राम विकास विभाग.